
म. ग्रं. सं. ठाणें
काव्य



मा. दा. देवकाते

REFBK-0016285
REFBK-0016285

313169

काव्य

...ाठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांत...
...नुक्रमांक ७३७३८ वि: काव्य
...नांक १९८० नों दि: ३१३१७९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

# शब्दशराब

## (मराठी शायरी)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७६२८५
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मा. दा. देवकाते

तीरंदाज प्रकाशन पुणें १६

किंमत एक रुपया

मराठीतील पहिले पॉकेटबुक

प्रकाशक : शापूर रूस्तुमजी तीरंदाज
तीरंदाज प्रकाशन,
विजय को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी,
ब्लॉक नंबर ७
विद्यापठि रोड, पुणे १६.

✦

१२ मे १९६७

मुखपृष्ठ : जोशी आर्टस्

पहिली आवृत्ति

✦

© मा. दा. देवकाते

✦

मुद्रक : बा. ल. घावरे
प्रभाकर मुद्रणालय, ४९४।१ सदाशिव पेठ,
पुणे ९.



ग्रंथालय
दा. क्र. १६२८५
(स्थळ

मधुर शब्दाचं गुंजन,
चालळय माझ्या मनी
अक्षरांच्या रांगा लावीत,
फिरतेय आज लेखणी
शब्दफुलांच्या वाहून माळा,
करतोय मी आरती
प्रसन्न होऊन देतेय,
आशिर्वाद सरस्वती.

मा. दा. देवकाते

REFBK-0016285
REFBK-0016285

# दोन शब्द

श्री. देवकाते यांच्या "शब्द-शराब" मधल्या कणिका वाचून पाहिल्या. त्यांच्यांत एक प्रकारची धुंदी आहे यांत शंका नाहीं. कांहीं चिंतनपर कणिका लक्षणीय आहेत. उदाहरणार्थ

अनंताच्या यात्रेंत
सोडून जातं कोणी
मनांत फक्त उरतात
सतावणाऱ्या आठवणी

किंवा

डोळ्यांच्या तबकांत निरांजन
ठेवुन जागविली रात
समईमधील तेल संपलं
तरीहि नुसती जळली वात

या हलक्या फुलक्या कणिका रसिकांचें मनोरंजन करतील अशी आशा आहे.

—अनंत काणेकर

ता. ६।५।६७



# प्रकाशकाचें दोन शब्द

श्री. मा. दा. देवकाते यांच्या मराठी शायरीचे पुस्तक 'शब्दशराब' वाचकांचे हाती देतांना मला आनंद वाटत आहे.

मराठीत शायरी वाचण्याची संधी आपणास प्रथमच मिळणार आहे. मराठीतलं हे पहिले पाकिटबुक असून किंमत फक्त एक रुपया ठेवली आहे.

मदिरा, प्रेम, विरह या विषयांवरील शायरीचा या छोट्या पुस्तकांत समावेश केला आहे. शब्दांपेक्षा त्यामागे दडलेली भावना आपणाला मोहित करील.

या पुस्तकासाठीं वेळ काढून पद्मश्री अनंत काणेकर यांनी चार शब्द लिहिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या पुस्तकाच्या कामीं मदत करणाऱ्या सर्व मित्रांच्या आणि संपादक मंडळींच्या सहकार्या बद्दल आभारी आहे.

*शापूर तीरंदाज*

*१२ मे १९६७*




कुंभ आहे, चषक आहे
शब्दांत इथं, शराब आहे
कुणी म्हणतील, चांगली आहे
कुणी म्हणतील खराब आहे

वेदनेतून जन्मलेलं
धुंद हे पद्द आहे
कुणी म्हणतात शायरी आहे
कुणी म्हणतात मद्द आहे

नकारातुन होकारात्मक
प्रेम कांही उसवत नाही
एक गोष्ट फक्त खरी
मदिरा कधी फसवत नाही

आठवणीत भिजलेलं
नवरंगी स्वप्न असावं
रात्री एकांती जवळ
मदिरेशिवाय कुणी नसावं



गावठी द्या, विलायती द्या,
प्याला मात्र भरून द्या

पिण्याला आहे बंदी
जीवन झालंय खराब
पानोपानी शब्दांतून
भरलीय इथं शराब

किती किती प्यालोय मी
गात्रांमध्ये त्राण नाही
मध्यरात्र सरलीय
बेहोषीला भान नाही

जीवनातल्या लाचारीनं
काम नाही बेकारीनं
देह हा पोखरला
प्रियसे भर तुच आता
काठोकाठ मदिरेचा प्याला



समोर असाविस तू
भरलेला प्याला असावा
आणि या जीवाला
कशाचाहि पाश नसावा

व्याला पुढे रिकामा
जीवन झालंय निरस
मदिराक्षीच्या अंगोपांगी
भरलेला असतो द्राक्षारस

मनातली स्मृति तुझी
अजून तरी बोलकी आहे
किती किती प्यालोय मी
शराब ही हलकी आहे

ओत आता सखये
प्याल्यामध्ये मदिरा
तुझ्या हातून पिण्यांत
आनंद वाटतो खरा




चुंबनाची ही तृष्णा
वाढत कशी जाते
प्यालो नाही शराब
चढत कशी राहते

पिवून पिवून देह
झालाय आता खराब,
प्याल्यात आहे मी,
माझ्यात आहे शराब

लोक पीत असतात
घाबरत घाबरत,
मी मात्र असतो सदा
प्याल्यामागून प्याले भरत

शहरात भरली होती
डॉक्टरांची परिषद,
सांगितलं त्यांनी मदिराच,
दुःखावरलं औषध




कुणी विचारा तिला
जगण्यात काय सजा आहे
कुणी विचारा मला
पिण्यात काय मजा आहे

शोध शोध शोधलं
तू नाहीं भेटलीस,
जगावेगळी किंमत मी
दिली अर्ध्या बाटलीस

⚜

आसवांत भिजलेली
दुःखी गाणी लिहित राहिलो
नव्हते पैसे जवळ
कर्ज काढून पित राहिलो.

⚜

लांबूनच पेटव
मित्रा तू सिगरेट
मदिरेची ही काया
घेईल नाहीतर पेट

बसलंय तिचं घर
माझ्या बरबादीने
पितोय आज मदिरा
तिच्याच मेहरबानीने



सकाळी द्या एक प्याला
दुपारी द्या एक प्याला
मदिरा नाही मिळाली तर
विष द्या आणून मला

सांडत होता यौवन प्याला
भरलेला शराब प्याला
समजेना सर्व प्रथम
लावू कोणता ओठाला

ओसाड माळरानी
बहरून यावी प्रीती
भरलेला प्याला घेवून
उभी असावी सौंदर्यवती

विसरण्यासाठी तुला
प्यालो ग्लास सारा
ओघळलेल्या थेंबात
दिसला तुझा चेहरा



भरलेल्या प्याल्यात मी
गोठवली वेडी माया
पडण्यातहि मजा येते
सावरायला हवी प्रिया

न रिता होणारा प्याला
परमेश्वरा पाठवून दे
नाहीतर व्याकुळलेलं
हृदय तरी बदलून दे

बुझवत असतो तहान कोणी
पिवून मदिरा फार
भरलेल्या प्याल्यात
बुडवित असतो अंगार

हेच जीवन असेल तर
मेलेलं बरं
भिती वाटते मरायला
प्यालेलं बरं

समोर होता ' प्याला '
पण मी भित होतो
घाबरत घाबरत लांबूनच
नजरेनं पित होतो

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 9 6265



मदिरेची ही बेहोषी
खरोखर न्यारी आहे
पण दुःखाची नशा
मद्याहून भारी आहे

अरे माझ्या मित्रा
उपकार कर आज
दोन प्याले मदिरा
उधारीवर पाज

नको मला गंगाजल
शेवटच्या क्षणाला
एक प्याला मदिराच
खूषी देईल मनाला

सरलं जीवन, सरलं आयुष्य
स्वर्गातून देवदूत आला
मी म्हटलं, थांब जरा
घेवू दे शेवटचा प्याला

आता शेवटची इच्छा
सांगतो मित्रा तुला
फक्त प्यालेल्या लोकांनीच
यावं अंतयात्रेला



गुलाल अत्तर शिंपून
ताटी माझी सजवा
उधळायची फुले मात्र
मदिरेतच भिजवा

अंतयात्रेला माझ्या
शुद्धीवर कुणी नसावेत
खांदेकरी ताटीचे
प्यालेलेच असावेत

तिरडीवर ठेवण्यापूर्वी
एक गोष्ट करा
शेवटच्या स्नानासाठी
वापरा जुनीच मदिरा

मद्याचे प्याले भरून
चितेवर रिते करा
पेटविण्यासाठी जवळ
जळती चारमीनार धरा

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५३५३८ दि: २५



मेल्यावर माझ्या पिंडाला
कावळा नाही शिवणार
पिण्याची इच्छा कधीच
पुरी नाही होणार



बाराव्या दिवशी मित्र
येतील माझ्या घरा
त्यांना प्याले भरून
पाजावी मदिरा

अस्ती जर का माझ्या कोणी
मदिरेत भिजवेलं
तेंव्हा कदाचीत चुकून
कावळा पिंडाला शिवेल

❦

लिहिण्यासाठी ' शब्द-शराब '
पेनमध्ये शाई भरली
कोऱ्या कागदावर मात्र
मदिराच अवतरली

❦

पिण्यात जीवन सरलं
शुद्धीवर कधी आलो नाही
एक गोष्ट मात्र खरी
लिहिताना कधी प्यालो नाही

कधी हातात माझ्या
होता तिनं हात दिला
आज आहे हाती माझ्या
भरलेला शराब प्याला



स्वार्थी आहे जग
बेगडी आहे माया
म्हणून पिवून पिवून
झिजवतोय मी काया

आता चढला कैफ आगळा
मनामध्ये खंत नाही
मदिरेत भिजलेल्या
निश्वासास अंत नाही

गलीस निघून अर्ध्यावर
फोल ठरला वायदा
आता शुद्धीवर येऊन तरी
तुच सांग काय फायदा !

चाललीस निघून, जा तू
माघारी नाही बोलविणार
उरलेलं आयुष्य आता
पिण्यातच घालविणार

कधी हसत असतो
कधी रडत असतो
कधी जास्त घेतलीतर
रस्त्यावरच पडत असतो

नको करूं उपदेश
पितो म्हणून फार
पिण्याचं कारण तुझ्या
मनालाच विचार



विचारलं तिनं मला
सनई यंदा वाजणार का ?
मी म्हटलं ओठाच्या प्याल्यातून
प्रथम, शराब मला पाजणार का ?

प्याल्या मागून प्याले घे
हरपून जाईल भान
पिण्याला बंदी करणारे
वेडे आहेत विद्वान

नको खिन्न होवूस
विसर आता दुःख
माझ्या मित्रा घे थोडी
मिळेल स्वर्गसुख

झेंप घेवून दीपावर
पतंग वेडा जळत असतों
पिल्यावर जीवनाचा
अर्थ मला कळत असतो



एकानं विचारलं मला
बंदीच्या सभेत बोलणार का ?
मी म्हटलं बोलेन पण
पिवून आलेलं चालणार का ?

मिळाली नाही शराब तर
चालता येत नाही मला
दोन प्याले पिल्याविणा
बोलता येत नाही मला

विचारलं एकान मला
आत्महत्येची संख्या वाढलीय का !
मी म्हटलं विद्वानांना
बंदीची नशा चढलीय का ?

तिनं विचारलं मला
सांग माझा होशील का !
मी म्हटलं अनुरागाचं फुल
मदिरेत भिजवून देशील का ?



असशील तुहि तिकडे
उधळीत शृंगाराला
बुडवित असतो मीहि
प्याल्यात अंगाराला

तुझ्या नांवानं पहिला प्याला
भरलाय मी आज
येणार नाही बहर वेलीला
गळून पडेल साज

कधी रात्रीच्या एकांती
सतावतात आठवणी
म्हणून ओतलय मीं
प्याल्यात रंगीत पाणी

मदिरेत बुडवितो
दुःख माझ्या मनाचे
आजचा दिवस पित राहिन
सांगावे उद्या कुणी कुणाचे



प्यालो नाही अशी कधी
चांदरात नाही आली
वधू बनून प्रिया
घरात नाही आली

नाहीं कुणाचा आधार
ओढ कुणाची मनी नाही
जगाच्या पाठीवर माझं
मदिरे शिवाय कुणी नाही



सांगीतलं एकानं बंदीवर
लिहा आता कांही
मी म्हटल पिल्याशिवाय
लेखणी उचलत नाही



सजवलस घर दुसऱ्याचं
तरीहि तू हरणार
मीहि तुझ्या आठवात
पित पित मरणार

खोटी सारी नाती गोती
प्रेमातहि असतो स्वार्थ
मैत्री होता मदिरेची
अधाराला येतो अर्थ



म्हणाली ती मला,
तुझ्या प्रेमाचं मुद्दल
परत करतेय आज–
मी म्हटलं सखये
चुंबनाचे व्याजापोटी
मुरलेली मदिरा पाज



म्हणतात विद्वान "चंद्रावर जायला
खर्च येईल फार"
मी म्हणतो "दोन प्याले मदिरा
आणि एक चारमीनार"

परमेश्वराने निर्मिलेली ही
शराब नव्हे, तीर्थ आहे
म्हणून म्हणतात, मदिराभक्त
बंदीचा कायदा व्यर्थ आहे.

विद्वानांचे सभेंत चालली होती
बंदीवर जोरदार चर्चा
पिणाऱ्यांनीं काढला होता
बंदी उठावी म्हणून मोर्चा

हृदयांत कळ दुःखाची
गालावर आसवाचा पूर
विद्वानांनो बंदी उठवा
प्यायला मिळूद्या भरपूर

डोळयांच्या तबकात निरांजन
ठेवून जागविली रात
समईमधील तेल संपल
तरीहि नुसती जळली वात



अनंताच्या यात्रेत
सोडून जातं कोणी
मनात फक्त उरतात.
सतावणाऱ्या आठवणी

वाटोळ्यानं केलं वाटोळं
सारं मला कळत होतं
मुसळधार पावसात
घर माझं जळत होतं

म्हणतात एकटा आहे
करतोय लेकाचा मजा
कुणा न ठावे भोगीत आहे
कुणासाठी ही सजा

येशील म्हणून तू
करतोय तुझी प्रतिक्षा
तुझ्यासाठी भोगतोय
जगण्याची शिक्षा

तुझ्याशिवाय जीवनात
अर्थच रहात नाहीं
पण तुझ्या प्रेमामुळे
मरताहि येत नाही



सोडून गेलीस या जगाला
हळहळली सारी चाळ
मीहि वाहिली तुझ्या शवाला
आसवांची पुष्पमाळ

पैशाचा आधार घेऊन
एका अमीराने खरेदी केली
कोमलांगी मिठीतली
बघता बघता ओढून नेली

जगण्यासाठी बेहोषींत
लिहावित गाणी
कशा परत येतील
हरवलेल्या आठवणी

युगेयुगे वाट पाहून
खप्पड झाले कोमल गाल
विरहाचे वणव्यानं
सुर्यंहि तिकडे झालाय लाल

कशी कळावी तुला
ही प्रीत पतंगाची
शिक्षा भोगी वेडा
प्रेमापायी जळायची



जीवनाच्या आडरानी
प्रिया सोडून गेली
फुटलेल्या पखालीचा
ओघळ आला गाली

आकाशातले विजदेवते
आमच्या प्रेमाची लाज राख
उगीचच जळणाऱ्यांना
झेप घेवून कर खाक

असेल स्वर्गीय अप्सरा
म्हटलं मी मनात
चंद्रसुर्याची कर्णफुले
होती तुझ्या कानात

भांडून माझ्याशी चालली होतीस
हवेत केस उडत होते
नव्हती चूक तुझी म्हणतेस
मग डोळे का रडत होते !

विसरलीस मला जरी तू
तुला विसरणं अवघड जातं
तू रंगवलस नाटक पण
मी, प्रेम केलं होतं



चाललीस निघून जाताना
धरीत नाही मनी राग
उजाड करून माझे जीवन
काय मिळवलंस तेवढं सांग ?

ढळणाऱ्या आसवांना
आवरशील किती
गालावर ओघळलेलं
दंव आहे का मोती ?

तुझ्याहून सौंदर्यवती
आहेत जगी फार
काय करू पण
होत नाही तयार

डोळ्यातल्या आसवांचा
गुंफला मी हार
तू म्हणतेस कविता
लिहिलीस सुंदर फार

तू मिळाली नाहीस तर
काय आहे या जगात ?
तुझंविण स्वप्नगंधे
अर्थ नाही जीवनात

तुझं हास्य न्हालं
रूपेरी चांदण्यात
थबकली काळ्या बटांत
अमावस्येची काळीरात



बघता बघता निघुन गेलीं
हृदयाचीं राणी
जखमेनं कात टाकली
पण तरीहि उरली निशानी

ठोकरल्यावर तिने मला
नाही उरला कोणी वाली
माझा अकाली मृत्यू झाला
तिच्या पदकमलाखाली

अर्ध्या प्रवासातुन
निघुन गेलीस
धरून मनी राग—
उमटला यशस्वी
जीवनावर माझ्या
अपयशाचा काळा डाग

डोळ्यांच्या तबकात
नको लावूस दीप
भिती वाटते जळून जाईल
पदर येता समीप

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................. वि: ..................
क्रमांक .................. ग्रं: वि: ..................



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६२८५
(स्थळ प्रत)

मी रडत असतो
मिळालाय मला धोका
भरल्या संसारात पण
सांग तू, रडतेस का ?

सर्व सुखाचं सिंचन
कर्दळीच्या विळख्यात
अमृताचा कुंभ फुटावा
ओठाच्या चवकात

⚜

प्रेमाच्या बाजारात
भटकलो मी वणवण
नाही धडकल कुणाचं
माझ्यासाठी मन

⚜

कथा राहिली अपुरी
अपुरी राहिली प्रीत
झाली नजरेची पांखरं
अध्यांवर निर्वासित

हे कृपाळू परमेश्वरा
इच्छापूर्तीसाठी
तुझ्यापुढे सारे
करतात नवस—



मला नको कांही
फक्त परत दे
माझी प्रियसी
आणि
हरवलेले दिवस—

जातांना तू हंसत होतीस
कढत होतीस मनातून
बेवारशी होवून प्रीत
हिंडत होती वनातून

भिडली नजरेला नजर
होणार पुढे काय ?
विसरून जायचं हसणं
जन्म घेतला रडाया

निम्या रातीला वाऱ्यानं
वाजू लागल कवाड
पूनवेचा चंद्र दडला
पदराचे ढगाआड

प्रेमाची आण माझ्या
घालू कशी सतीला
आयुष्य लाभो माझे
प्रिये तुझ्या पतिला



कथा राहिल अपुरी
नाही परी मनी हेवा
तुझा सुखी संसार ग
वेडचा कथेला विसावा

होशील का तू माझी ?
विचारता मी सवाल
घेतली तिनं चेहऱ्यावर
काळ्या बटांची शाल,

जावू नकोस मध्येच सोडून
घालून वर्मी घाव
जायच असेल तर माझ्या चितेला
तुझ्याच हातानं आग लाव

जपली होती तुझी प्रतिमा
माझ्या मनीच्या बंगल्यात
म्हणून कांही रात्री
तुझ्याशिवाय रंगल्यात

माझ्या स्मृतीचा दीप
जाशील तिथं सांभाळ
कोणी सांगावं येईल कधी
आयुष्यांत संध्याकाळ.



ठेवला जर का ज्योतीवर
पहारा या जगानं
मरण्यासाठी सांगा
जावं कुठं पतंगानं ?

कळला मला जीवनाचा
अर्थ जेव्हां खरा
पापणीतल्या पाण्याचा
आटला होता झरा–

नको छळूस अशी
एकदा तरी येऊन जा–
मनातल्या आठवणी
ठेऊं नकोस; घेऊन जा

अथांग सागरातलं जळ
कसं पिवू एका घोटांत ?
साऱ्या प्रीतीचं आचमन
कसं करूं एका चुंबनांत ?

माझ्या प्रकाशक मित्रा
बजावून ठेवतो आज
मेलो मी तर, रॉयल्टीतून
चाहत्यांना मदिराच पाज




जे पिणारे आहेत
त्यांनी मदिरा प्यावी
जें पित नाहीत त्यांनी
"शब्दशराब" चाखावी

वाट पाहून तुझी 'फुला'
बघ किती तास झाले
काल केलेल्या गुळगुळीत दाढीला
आज पुन्हा काटे आले

सासरी तू चालली होतीस
रक्त माझं कढंत होतं
निरोप देतांना हसत होतो
मन माझं रडत होतं

येते कुणी आयुष्यांत
धोका देऊन पळत असते
फक्त माझ्यासाठीं ओठी
चारमीनार जळत असते



अंधार ! अंधार ! रडतोस कशाला
तोड सारे पाश
प्रगतिसाठी ओढून आण
चंद्रताऱ्यांचा प्रकाश

ठेवला जर का ज्योतिवर
पहारा या जगानं
मरण्यासाठी सांगा
जावं कुठ पतंगानं ?

आडरानी सोडून मला
नको प्रियसे जाऊस
पडेल माझ्या गालावर
ढगाशिवाय पाऊस

आकाशांत किती दूर
आहेत चंद्रतारे
तू आलीस आणि
जवळ आले सारे

सौंदर्यवतींचा तांडा पाहून
गोंधळून गेलो खरोखर
तूच सांग इश्वरा
कुठली टाकलीस नांवावर ?



विझव ही मनातील आग
लावू नकोस विलंब
असं म्हणतांच बोलविलास तू
फोन करून आगीचा बंब

वाटलं पहात रहावं
तुझा सुंदर चेहरा
काळया बटाची नागीन
देत होती पहारा

सोडून गेली अध्यावर
घालून वर्मी घाव
काळया बटाच्या ढगानं
दूर केला वर्षाव

संग्रह शाखा
REFBK-0016285
REFBK-0016285

मनातली प्रीत माझ्या
कशी येईल ओठावर
गुलाबाचा गंध कधी
असतो का रे देठावर ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.